तपासी अंमलदार

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** संगमनेर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0627 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**08/07/2025 00:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 07/07/2025
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/07/2025
**Time From (वेळेपासून):** 10:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:31 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 08/07/2025 **Time (वेळ):** 00:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/07/2025 00:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एसटी स्टँडजवळील,अकोले रोडवरील , हॉटेल उपसरपंच चहा येथे,संगमनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भाऊसाहेब लक्ष्मण पवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो कनोली,ता संगमनेर ,संगमनेर शहर ,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो कनोली,ता संगमनेर ,संगमनेर शहर ,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9623479117

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोश बाबासाहेब शेलार | | | 1. इंदिरानगर, गल्ली नं 08,, तासंगमनेर,,संगमनेर शहर , अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर
दि.08/07/2025

मी भाऊसाहेब लक्ष्मण पवार, धंदा- सरपंच, कनोली, ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर, रा. मु.पो.कनोली, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर मो.नं. 9623479117
समक्ष हजर राहुन तक्रार लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासोबत राहणेस असून मी जानेवारी 2021 पासुन कनोली गावच्या ग्रामपंचायतीचा सरपंच म्हणून काम पाहात आहे. ग्रामपंचयात कनोली षिवारात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजने अंतर्गत मंजुर असलेल्या घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार मोफत 5 ब्रास वाळुवाटप सुरू करणेत आलेली आहे. सदर वाळु वाटप करणेसाठी ग्रामपंचायत पातळीवर वाळु वाहतुकीसाठी पाच ट्रक्टर वाहनांना व वाळु उपसा करण्यासाठी एक जेसीबी व एक फरांडी ट्रॅक्टरला मंजुरी देणेबाबत दि.01/07/2025 रोजी मा.तहसिलदार, संगमनेर यांना पत्रव्यहार करण्यात आला त्यास मा.तहसिलदार, संगमनेर यांनी मंजुरी दिलेली आहे. मा.तहसिलदार यांची घरकुल लाभथ्र्यांना वाळुवाहतुक करण्यासाठी मंजुरी मिळालेल्या ट्रॅक्टर मध्ये माझ्या मालकीचा एक ट्रॅक्टर आहे. दि. 02/07/2025 रोजी मी कनोली गावच्या शिवारातील प्रवरानदी पात्रातुन माझ्या ट्रॅक्टर व्दारे वाळुवाहतुक करण्याचे कामकाज करीत असताना कनोली गावाचे तलाठी भाऊसाहेब श्री. शेलार हे तेथे आले त्यावेळी ते मला म्हणाले की तुमच्या वाहनांना तहसिलदार साहेबांनी घरकुल लाभथ्र्यांसाठी वाळुवाहतुक करण्याची परवानगी दिली आहे. परंतु तुम्ही सर्व वाळु वाहतुक करणा-या ट्रॅक्टर वाहनांचे मिळुन मला 30,000/- रूपये दया नाहीतर मी तुमच्यावर अवैध रित्या वाळुवाहतुक करीत असलेबाबत कारवाई करेल. त्यावेळी माझ्या लक्षात आले की, श्री.शेलार, तलाठी हे माझ्याकडे घरकुल लाभर्थ्याच्या वाळुवाहतुक करण्यासाठी लाचेची मागणी करीत आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्यामुळे मी दिनांक 04/07/2025 रोजी सकाळी पो.नि.छाया देवरे मॅडम, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अहिल्यानगर यांना फोनवर सदरबाबत तक्रार दिली व मी आज दिनांक 07/07/2025 रोजी तलाठी शेलार, सजा कनोली, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर यांना माझ्या कामासंदर्भाने भेटणार आहे असे सांगीतले होते.
त्यानुसार दि 07/07/2025 रोजी सकाळी 09.30 वाजेचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर च्या अधिकारी छाया देवरे मॅडम व कर्मचारी हे मी सांगितलेल्या पत्त्यावर संगमनेर शहर येथे सुरक्षित ठिकाणी आले. सदर ठिकाणी पोनि छाया देवरे यांनी माझा परिचय करुन घेतला तसेच मला त्यांचा व त्यांचे सोबतचे कर्मचारी, दोन शासकीय पंचाचा परिचय करुन दिला.
त्यानंतर मी वरील आशयाची माझी तक्रार पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना दोन पंचासमक्ष तोंडी सांगीतली त्यावेळी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सदरची तक्रार लेखी लिहुन देण्यास सांगीतली असता मला व्यवस्थित लिहता व वाचता येत नसल्यामुळे माझी वरील तक्रार माझे सांगणेप्रमाणे माझे मित्र श्री.सचिन वर्पे यांनी लिहली. ती तक्रार पो नि देवरे मॅडम व दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली, त्यावर मी, दोन पंचांनी व पो.नि.देवरे मॅडम यांनी सहया केल्या. त्यांनतर माझ्या तक्रारी वरुन षेलार तलाठी, कनोली, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर हे माझ्या वरील कामासाठी माझ्याकडे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. पोनि देवरे मॅडम यांनी सदर पडताळणी कारवाईमध्ये व्हाईस रेकार्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला, माझे मित्र श्री. सचिन वर्पे यांना व पंचांना माहिती दिली, तसेच पडताळणी कारवाई बाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि.छाया देवरे मॅडम यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे, दोन्ही पंचांचे व माझे मित्र श्री. सचिन वर्पे यांच्या उपस्थिती बाबत निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पो.नि.देवरे मॅडम यांच्या सुचनेवरून माझे मित्र श्री.सचिन वर्पे यांनी त्यांच्या फोनवरून तलाठी शेलार यांच्या मोबाईल फोनवर फोन करून कोठे भेटायचे

याबाबत विचारले असता त्यांनी एस.टी स्टॅंडजवळील, अकोले रोडवरील हाटेल उपसरपंच चहा येथे भेटण्याबाबत सांगितले. त्यानंतर पोनि छाया देवरे यांनी व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिले व शेलार तलाठी, कनोली यांची भेट घेण्यासाठी मला, माझे मित्र सचिन वर्पे व पंच क्र.1 यांना माझे मित्र सचिन वर्पे यांच्याकडील महिन्दा झायलो कंपनीची चारचाकी गाडी क्रं. एम एच 14 डी.एफ.0202 हिने रवाना केले.
त्यानुसार आंम्ही एस.टी स्टॅंडजवळील, अकोले रोडवरील हा◌ॅटेल उपसरपंच चहा येथे गेलो असता त्याठिकाणी श्री. षेलार, तलाठी हजर होते, त्यावेळी तलाठी षेलार, माझ्यात व माझे मित्र सचिन वर्पे यांच्यात वाळु उपसा ट्रॅक्टरच्या वाहतुकी संदर्भाने चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान तलाठी षेलार म्हणाले की, तुम्ही तुमच्या मनाने दया, तुम्ही ठरवशाल ते पॅकेट दया मला. त्यावर मी तलाठी शेलार यांना म्हणालो की, तुम्ही नाराज नको त्यावर तलाठी षेलार मला म्हणाले की, पंचवीसएक पर्यत करा, त्यावर माझे मित्र वर्पे लोकसेवक शेलार यांना म्हणाले की, पंचवीस हजार का? त्यावेळी लाकसेवक षेलार यांनी होकार्थी मान हलवुन तुमच्या मनाने करा असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यानंतर मी त्यांचेकडे पैसे आणण्यासाठी वेळ मागुन घेतला. लोकसेवक शेलार यांना आमचा संषय येवु नये म्हणुन माझे मित्र वर्पे हे त्यांच्या सोबतच थांबुन राहिले. मी व पंच नं 1 असे लोकसेवक षेलार यांच्या मोटार सायकलने सापळा पथक थांबले त्याठिकाणी परत आलो.
सदर बाबत मी व पंच क्र.1 अषांनी पो नि देवरे मॅडम यांना माहिती दिली, तसेच पो.नि. देवरे मॅडम यांनी पंचांसमक्ष व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये रेका◌ॅर्ड झालेले संभाशण ऐकले. त्यावरुन षेलार तलाठी यांनी माझ्याकडे कनोली गावच्या घरकुल लाभर्थ्यांना वाळुपुरवठा करणाÚया ट्रॅक्टवर कारवाई न करण्यासाठी 25000/- रुपये लाच मागणी करून ती लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर शेलार, तलाठी कनोली, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर पो.नि. देवरे मॅडम यांनी सापळा कारवाईमध्ये अ◌ॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा वापरण्यात येणार असुन त्याबाबत पोना.काळे यांनी मला व पंचांना उजेडात व अंधारात प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पो.नि. देवरे यांचे सुचनेवरुन मी लाच रक्कम 25000/- रुपये माझ्या बचतीतुन हजर केली. त्यात 500 रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा मी हजर केल्या, त्यानंतर सदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर नोटांवर अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिषात ठेवली त्यानंतर मला व पंचांना सापळा कारवाई बाबत पो.नि. देवरे यांनी सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि.देवरे मॅडम यांनी व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करुन माझ्याकडे दिला त्यानंतर मला व पंच क्र. 1 यांना षेलार तलाठी यांची भेट घेवुन त्यांनी मागणी केलेली 25000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक आले. स्टॅंड जवळील, अकोले रोडवरील, उपसरपंच चहा येथे गेल्यावर षेलार तलाठी व माझे मित्र सचिन वर्पे यांच्या जवळ गेलो. पंच देखील माझ्या सोबत सदर ठिकाणी येवुन थांबले. त्यावेळी मी माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात हात घालुन लाचेची रक्कम काढुन षेलार तलाठी यांच्या समोर धरली असता तलाठी षेलार यांनी सदरची रक्कम उजव्या हाताने स्विकारली. थोडयाच वेळात मी मला ठरवुन दिलेला लाच रक्कम स्वीकारले बाबतचा डावा हात डोक्यावरुन फिरविण्याचा नियोजीत इषारा सापळा पथकास केला असता बाजु◌ुला आडोषाला उभे असलेले पो नि देवरे मॅडम व सापळा पथक सदर ठिकाणी आले व लोकसेवक षेलार, तलाठी यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले. पो.नि.देवरे मॅडम यांनी माझ्याकडुन व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यावेळी पोनि देवरे यांनी लोकसेवक श्री षेलार यांना त्यांचे पुर्ण नाव, पद व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संतोश बाबासाहेब शेलार वय- 40 वर्शे, तलाठी, सजा- कनोली, ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर रा. इंदिरानगर, गल्ली नं. 08, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर, असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री संतोश शेलार यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आलेली लाच रक्कम सापळा कारवाई पुर्वी लिहुन घेण्यात आलेल्या नोटांच्या नंबरषी पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळल्याची खात्री झाली. त्यानंतर पोनि देवरे यांनी लोकसेवक षेलार यांना सोबत घेवुन पुढील कामाकाज कामी ते शासकीय विश्रामगृह, संगमनेर येथे आले. त्यांचे सुचनेप्रमाणे मी देखील तेथे हजर झालो. पोनि देवरे व सापळा पथक यांनी त्यांचे त्या ठिकाणी पुढील कामकाज केले.
तरी दिनांक 07/07/2025 रोजी 10.40 वा. ते 11.03 वा. दरम्यान लाच मागणी पडताळणीच्या वेळी व 11.27 ते 11.31 वा.दरम्यान यशस्वी सापळा कारवाईच्या वेळी ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर येथील एस.टी स्टॅंडजवळील, अकोले रोडवरील हा◌ॅटेल उपसरपंच चहा येथे संतोश बाबासाहेब षेलार वय- 40 वर्शे, तलाठी, सजा- कनोली, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर रा. इंदिरानगर, गल्ली नं. 08, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर यांनी माझ्याकडे कनोली गावच्या घरकुल लाभर्थ्यांना वाळुपुरवठा करणाऱ्या ट्रॅक्टवर कारवाई न करण्यासाठी 25000/- रुपये लाच मागणी करून सदर लाचेची रक्कम पंच क्र.1 यांचे समक्ष स्विकारली म्हणुन माझी श्री संतोश बाबासाहेब शेलार वय- 40 वर्षे, तलाठी, सजा- कनोली, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर रा. इंदिरानगर, गल्ली नं. 08, ता.

संगमनेर, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.पुढील तपास पो.नि.छाया देवरे नेम - ला.प्र वि. अहिल्यानगर या करत आहेत.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Ravindra Narsinh Deshmukh(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
संगमनेर शहर पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Ravindra Narsinh De

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):